सकाळ
कोल्हापूर, बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६

# श्रीशैल मिस्टर विवेकानंद, तर आर्या मिस विवेकानंद

कोल्हापूर, ता. २४ : स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील कलाकौशल्यांना प्रोत्साहन देण्याचे काम विवेकानंद कॉलेज करीत आहे. स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थी नावलौकिक मिळवतील, असे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी सांगितले. ते विवेकानंद महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते.



कोल्हापूर : विवेकानंद महोत्सवात मिस्टर विवेकानंद श्रीशैल शिंदे, मिस विवेकानंद म्हणून आर्या काटकर यांनी विजेतेपद पटकावले.

श्रीशैल शिंदे याची मिस्टर विवेकानंद म्हणून, तर आर्या काटकर हिची मिस विवेकानंद म्हणून निवड झाली. महोत्सवात स्टुडंटस् एक्स्पो हा उपक्रम झाला. महाराष्ट्र व्यवसाय प्रशिक्षण मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह भोसले, सप्रे इंडस्ट्रीजच्या संचालक रेणुका सप्रे यांनी भेट दिली. महाविद्यालयातील ऑस्ट्रेलिया व आफ्रिकेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या देशाची संस्कृती व हस्तकलांचे प्रदर्शन मांडले होते. जितेंद्र देशपांडे, प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. उमाकांत पाटील, डॉ. अजय आंभोरे, वैभव चव्हाण, नेहा भस्मे, विष्णू वजार्डे, गीतांजली ठोमके, संग्राम भालकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. आयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. डॉ. विकास जाधव, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, संजय दळवी उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी प्रास्ताविक केले.

पुढारी बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६

# 'मानसिक व सामाजिक आरोग्य महत्त्वाचे'

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैली अंगीकारावी. आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे तर शारीरिक-मानसिक पूर्णपणे सुस्थितीत असणे गरजेचे आहे, असे मत सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. कल्पना कांबळे यांनी व्यक्त केले. विवेकानंद ज्युनिअर कॉलेज स्क्वॉफ अंतर्गत आयोजित कार्यक्रमात उद्घाटनाच्या प्रसंगी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात होते. प्रा.शिल्पा भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेजच्या वतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. प्रा.गीतांजली साळुंखे, प्रा.बी.एस.कोळी, प्रा. एम. आर. नवले यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. प्रा. अश्विनी गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. उत्तम तिजाईकर यांनी आभार मानले.

26

25-2-2026